# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग व्यक्तींचे सामाजिक - आर्थिक
**{ स.वि.विभाग }** मॅपिंग करून त्यांची माहिती गोळा करणे,त्यांना गाळून त्यांची युडीआयडी नोंदणी सुरु करणे आणि दिव्यागांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तातडीने उपाययोजना करता याव्यात याकरिता दिव्यांगांचा सखोल होम-टू- होम सर्वेक्षण करण्यासाठी संस्था निवडीस्तव निविदा प्रक्रिया राबविण्यास्तव तसेच आशा सेविका यांच्यामार्फत सर्वेक्षण करण्याकरिता येणारा मानधन खर्च हा महानगरपालिका कडून करण्यास मा.आयुक्त,मनपा यांनी दि.7.11.2024 रोजी मान्यता प्रदान केली.

त्याअनुषंगाने विभागाकडून ऑनलाईन निविदा मागविण्यात येऊन निविदाकार महात्मा गांधी सेवा संघ, छ.संभाजी नगर यांची निवड करण्यात आली. निविदाकार तांत्रिक मुल्यामापणात पात्र असल्याने त्यांच्या व्यापारी लिफाफा उघण्यात आला.त्यामध्ये निविदाकारांनी प्रती दिव्यांग सर्वेक्षणाचे दर रु.46.78/- दिले होते. तद्नंतर मा.अति.आयुक्त (शहर) यांचे अध्यक्षतेखाली दि.13.01.2025 रोजी वाटाघाटीची बैठक घेण्यात आली.वाटाघाटी अंती नागपूर शहरातील घरोघरी दिव्यागांचे सर्वेक्षण करण्यासाठी सुधारित दर प्रती दिव्यांग 40 रुपये करण्यास संस्थेने सहमती दर्शविली.त्याचप्रमाणे होम-टू-होम सर्वेक्षण आशा सेविका यांच्यामार्फत करण्याकरिता वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी सादर केलेल्या दरानुसार सर्वेअर्सचे प्रती कुटुंब दर 15 रुपये तसेच प्रती दिव्यांग दर 20 रुपये दिलेले आहे.

नागपूर शहरात साधारणत: एकूण 5,50,000 इतके गृहकुल/कुटुंब (Household) आहेत.या गृहकुलात साधारण 100000 दिव्यांग आढळतील असे गृहीत धरल्यास सर्वेअर्स च्या मानधनाचा खर्च प्रती गृहकुल/ कुटुंब 5,50,000 X रु.15 = रु.82,50,000/- तसेच प्रती दिव्यांग 100000 X रु.20 = 20,00,000/- असे एकुण रु.1,025,0000/- अपेक्षित आहे.

त्याचप्रमाणे संस्थेस शहरातील साधारण दिव्यांग 100000 X रु.40 = रु.40,00,000/- प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

यानुसार एकत्रित खर्च रु.1,025,0000 + रु.40,00,000/- = रु.1,42,50,000/- ( अक्षरी - एक कोटी बेचाळीस लक्ष पन्नास हजार रुपये) या प्रकल्पास अपेक्षित आहे.सदहू खर्च दिव्यागांकरिता राखीव पद क्र. A२७३०१३४२३०२ मधून करण्यात येईल.

करिता,नागपूर शहर महानगरपालिका हद्दीतील होम-टू- होम जाऊन दिव्यांग व्यक्तींचे सामाजिक - आर्थिक जिवनचक्राचे सर्वेक्षण (मॅपिंग) करून त्याच्या कृती आराखडा तयार करणेकरिता येणाऱ्या रु.1,42,50,000/- ( अक्षरी - एक कोटी बेचाळीस लक्ष पन्नास हजार रुपये) खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याच्या प्रश्न विचारात घेणे.

टिप सविस्तव माहिती नस्तीत संलग्न -

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 125/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 11/02/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त, समाज विकास विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग व्यक्तींचे सामाजिक - आर्थिक - मॅपिंग करून त्यांची माहिती गोळा करणे,त्यांना गाळून त्यांची युडीआयडी नोंदणी सुरु करणे

आणि दिव्यागांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तातडीने उपाययोजना करता याव्यात याकरिता दिव्यांगांचा सखोल होम-टू- होम सर्वेक्षण करण्यासाठी संस्था निवडीस्तव निविदा प्रक्रिया राबविण्यास्तव तसेच आशा सेविका यांच्यामार्फत सर्वेक्षण करण्याकरिता येणारा मानधन खर्च हा महानगरपालिका कडून करण्यास मा.आयुक्त,मनपा यांनी दि.7.11.2024 रोजी मान्यता प्रदान केली.

त्याअनुषंगाने विभागाकडून ऑनलाईन निविदा मागविण्यात येऊन निविदाकार महात्मा गांधी सेवा संघ, छ.संभाजी नगर यांची निवड करण्यात आली. निविदाकार तांत्रिक मुल्यामापणात पात्र असल्याने त्यांच्या व्यापारी लिफाफा उघण्यात आला.त्यामध्ये निविदाकारांनी प्रती दिव्यांग सर्वेक्षणाचे दर रु.46.78/- दिले होते. तद्नंतर मा.अति.आयुक्त (शहर) यांचे अध्यक्षतेखाली दि.13.01.2025 रोजी वाटाघाटीची बैठक घेण्यात आली.वाटाघाटी अंती नागपूर शहरातील घरोघरी दिव्यागांचे सर्वेक्षण करण्यासाठी सुधारित दर प्रती दिव्यांग 40 रुपये करण्यास संस्थेने सहमती दर्शविली.त्याचप्रमाणे होम-टू-होम सर्वेक्षण आशा सेविका यांच्यामार्फत करण्याकरिता वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी सादर केलेल्या दरानुसार सर्वेअर्सचे प्रती कुटुंब दर 15 रुपये तसेच प्रती दिव्यांग दर 20 रुपये दिलेले आहे.

नागपूर शहरात साधारणत: एकूण 5,50,000 इतके गृहकुल/कुटुंब (Household) आहेत.या गृहकुलात साधारण 100000 दिव्यांग आढळतील असे गृहीत धरल्यास सर्वेअर्स च्या मानधनाचा खर्च प्रती गृहकुल/ कुटुंब 5,50,000 X रु.15 = रु.82,50,000/- तसेच प्रती दिव्यांग 100000 X रु.20 = 20,00,000/- असे एकूण रु.1,025,0000/- अपेक्षित आहे.
त्याचप्रमाणे संस्थेस शहरातील साधारण दिव्यांग 100000 X रु.40 = रु.40,00,000/- प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

यानुसार एकत्रित खर्च रु.1,025,0000 + रु.40,00,000/- = रु.1,42,50,000/- ( अक्षरी - एक कोटी बेचाळीस लक्ष पन्नास हजार रुपये) या प्रकल्पास अपेक्षित आहे.सदर्हू खर्च दिव्यागांकरिता राखीव पद क्र. A२७३०१३४२३०२ मधून करण्यात येईल.

करिता,नागपूर शहर महानगरपालिका हद्दीतील होम-टू- होम जाऊन दिव्यांग व्यक्तींचे सामाजिक - आर्थिक जिवनचक्राचे सर्वेक्षण (मॅपिंग) करून त्याच्या कृती आराखडा तयार करणेकरिता येणाऱ्या रु.1,42,50,000/- ( अक्षरी - एक कोटी बेचाळीस लक्ष पन्नास हजार रुपये) खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याच्या प्रस्तावास मा.प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.